महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ७८०७ दि.- ५/२/२०२४

## अपिलाची सुनावणी

(अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.)

दिनांक – ३१ / ०१ /२०२४ दिनांक – दुपारी १.०० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.

प्रति,

**श्री. एस के मुळे**
**धनकवडी ट्रक टर्मिनल व्यापारी संघ**
**स नं १९/अ /४ /अ ब धनकवडी सातारा रोड**
**पुणे – ४११०३७** } अपिलार्थी

श्री राजेश फटाले
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री एस के मुळे माहिती अधिकारातीलयांचा मा (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) ०४ /०१ /२०२४ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता स्थापित्य विभाग , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका आ. क्र.९५९५ दि. ०४ /०१ /२०२४ यांना दिनांक ( यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) रोजी प्राप्त झाला.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| २७ /१० /२०२३ | आ क्र ७४३१ २७ /१० /२०२३ | २६ /११ /२०२३ | जा क्र – ५५९५ ०९ /११ /२०२३ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती देण्यात आलेली आहे.त्यांना माहितीचे समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी त्यांचा अपिल अर्ज दिनांक ०४/०१/२०२४ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्तझाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| ०४/०१/२०२४ | ०४ /०१ /२०२४ | अपिल अर्ज मुदतीत आहे |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि. ३१/०१ /२०२४ रोजी दुपारी १.०० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी - उपस्थित
सुनावणीस सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –

| अ.क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | धनकवडी ट्रक टर्मिनल अंतर्गत रस्ता वरील अतिक्रम हटवून रस्ता दुरुस्त करण्याबाबत उपरोक्त विषय व संदर्भा अन्वये आपल्या कार्यालयाकडून कुठलीही कार्यवाही झाली नाही. कार्यवाहीस विलंबाची कारणे दया.<br>सदर अंतर्गत रस्ता अतिक्रमण हटवून केव्हा दुरुस्त होईल डांबरी करन केव्हा होईल. | सदर अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता पथ विभाग झोन ५ यांच्या कडे जा क्र ५५९५ दि.०९/११/२०२३रोजी वर्ग करण्यात आला आहे त्यानुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभाग व बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांनी संयुक्तीकरीत्या लेआऊटनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन पत्रव्यवहाराद्वारे करण्यात आलेले आहे. आवश्यक ती कागदपत्रे आल्यानंतर बजेटची उपलब्धता करून रस्त्याची दुरुस्ती करता येणार आहे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ३१/०१/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री एस के मुळे धनकवडी ट्रक टर्मिनल व्यापारी संघ हे उपस्थित होते. सदर दिनांकास श्री राजेश फटाले जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच श्रीमती नूतन सिनारे सहा जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, उपस्थित होते.

अपिलार्थी श्री एस के मुळे धनकवडी ट्रक टर्मिनल व्यापारी संघ यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जात विचारलेली माहिती अपिलार्थी यांना माहितीचे समाधान न झाल्याने अपिल अर्ज दाखल केला असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारीयांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले आदेश'</u>

पुढील प्रमाणे पारित आदेशानुसार,जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी मालमत्ता व व्यवस्थापन विभाग यांच्याकडे धनकवडी ट्रक टर्मिनल व्यापारी संघ येथील मिळकतीच्या अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे हस्तांतराचे कागदपत्रे लेआऊटनुसार बिबवेवाडी कार्यालयाकडे सपुर्त करण्याबाबत कार्यवाही करण्याचे नियोजन पत्रव्यवहाराद्वारे करण्यात यावे. आवश्यक ती कागदपत्रे आल्यानंतर बजेटची उपलब्धता करून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी.तसेच के के मार्केट येथील कचरा व राडारोडा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अतिक्रमण निरीक्षक यांनी संबधित जागा पाहणी करून कारवाई करावी. सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

( प्रदीप आव्हाड )
**अपिलीय अधिकारी तथा**
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्याल
पुणे महानगपालिका

<u>टिप –</u>

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत <u>www.punecorporation.org</u>या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत -

१. श्री राजेश फटाले,जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
२. श्री सुनील मोहिते जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
३. श्री गणेश तारू जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
४. श्रीमती नूतन सिनारे सहा. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, स्थापत्य विभाग बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.